**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

जाक्र/पोउआ/वाहतुक/आषाढी/वा.बदल/१०८०२९०/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- २०/०६/२०२४

दिनांक २८/०६/२०२४ रोजी पासुन आषाढी पालखी (दिंडी) सोहळा सुरु होणार असुन दिनांक २९/०६/२०२४ रोजी जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी देहु इनामदार वाडा येथुन विठ्ठल मंदीर आकुर्डी येथे मुक्कामासाठी येणार आहे.तसेच संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज याची पालखी गांधीवाडा आळंदी येथे मुक्काम करणार असुन तद्नंतर दोन्ही पालख्या दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पुणे बाजुकडे प्रयाण करणार आहेत. त्यामुळे रोडवर मोठया प्रमाणावर नागरिकांची वर्दळ राहणार असुन पालखी उत्सव (दिंडी) सोहळा निर्वीघ्न पार पाडणेकरता पालखी (दिंडी) मार्गावरील वाहतुक वळविणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विशाल गायकवाड , पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२४- पालखी सोहळयाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड आयुक्तालया अंतर्गत वाहतूकीत करण्यात आलेले बदल**
**आळंदी येथुन प्रस्थान दि.२९/०६/२०२४**
**मुक्काम आळंदी दि.२९/०६/२०२४**
**आळंदी ते पुण्याकडे प्रस्थान दि.३०/०६/२०२३**

## दिघी आळंदी वाहतूक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १. | चिंबळी ते आळंदी रस्ता | चिंबळी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीन चौक |
| २. | चाकण ते आळंदी रस्ता | आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीनचौक |
| ३. | वडगाव घेणंद ते आळंदी | चाकण-वडगांव घेणंद शेळपिंपळगाव मार्गे आळंदीकडे येणारी वाहने | १. कोयाळी कमान, कोयाळी-मरकळगाव मार्गे |
| ४. | मरकळ ते आळंदी रस्ता | मरकळकडुन धानोरेफाट्या मार्गे आळंदीकडे येणारी वाहने | धानोरेफाटा - चऱ्होली फाटा- मॅगझीनचौक /अलंकापुरमचौक मार्गे |
| ५. | भारतमाता चौक ते | भारतमाता चौक, मोशी | १ जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम |

| | | | |
|---|---|---|---|
| | आळंदी रस्ता | येथुन आळंदीकडे येणारी वाहने | चौक मार्गे<br>२. भोसरी चौक- मॅगझीन चौक<br>३. मोशी-चाकण-शिक्रापुर मार्गे |
| ६. | मोशी आळंदी रस्ता | मोशी चौक येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीन चौक<br>३. मोशी-चाकण-शिक्रापुर मार्गे |
| ७. | विश्रांतवाडी ते आळंदी रस्ता | पुणे-दिघी मॅगझीन चौकाकडुन आळंदीकडे येणारी वाहने | १. भोसरी-मोशी-चाकण मार्गे,<br>२. चऱ्होली फाटा ते कोयाळी, शेळपिंपळगाव मार्गे जातील<br>३.अलंकापुरम - जयगणेश साम्राज्य चौक मार्गे |
| ८ | पुणे बाजुकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना चऱ्होली फाटा चौकाचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |
| ९ | मोशी बाजुकडुन आळंदी कडे येणाऱ्या वाहनांना डुडुळगाव जकात नाक्याचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |
| १० | चिंबळी बाजुकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना केळगाव चौक/ बापदेव चौकाचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |
| ११ | चाकण बाजुकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना इंद्रायणी हॉस्पीटलचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |
| १२ | वडगाव घेणंद बाजुकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना विश्रांतवडचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |
| १३ | मरकळ बाजुकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना धानोरीफाटा/पीसीएस चौकाचे पुढे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | | |

वरील मार्गावरील वाहतूक बदल दि.२५/०६/२०२४ रोजी दुपारी १२/०० वा ते दिनांक ३०/०६/२०२४ रोजी रात्रौ २१.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन**) वाहतूक वळविण्यात येणार आहे.

## <u>भोसरी वाहतूक विभाग</u>

४. हवालदार वस्ती (वाय जक्शन) ते मोशी चौक दरम्यानचा रस्ता दिनांक २७/०६/२०२४ ते ३०/०६/२०२४ रोजी पर्यत एकेरी वाहतुक करण्यात येवुन मोशी ते हवालदारवस्ती कडे जाणारा रस्ता हा सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतूकीस प्रवेश बंद असेल.

**पर्यायी मार्ग- सदर मार्गावरील वाहतुक ही भारतमाता चौकातुन हवालदार वस्ती कडे जाईल**

५. मोशी भारतमाता चौक ते हवालदार वस्ती (वाय जक्शन) कडे जाणा-या जडवाहनास दिनांक २७/०६/२०२४ ते ३०/०६/२०२४ रोजी पर्यत प्रवेश बंदी असेल.

६. भोसरी पांजरपोळ चौक ते अंलकापुरम चौकाकडे जाणा-या जडवाहनास दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पहाटे ०४.०० वा ते २२.०० वा.पर्यत पर्यत प्रवेश बंदी असेल.

**पर्यायी मार्गे- सदर मार्गाने जाणारी जड वाहतुक पांजरपोळ चौकातुन पुढे भोसरी ब्रिज-जेआरटी टाटा ब्रिज वरुन सरळ कोकणेचौक –जगताप डेअरी चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.**

वरील मार्गावरील वाहतूक बदल दि.२७/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा ते दि. ३०/६/२०२४ रात्रौ २२.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन**) वाहतूक वळविण्यात येणार आहे.

**जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा २०२४- पालखी सोहळयाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड आयुक्तालया अंतर्गत वाहतूकीत करण्यात आलेले बदल.**

**देहुगाव येथुन प्रस्थान व मुक्काम दि.२८/०६/२०२४**

**मुक्काम आकुर्डी विठ्ठलमंदीर दि.२९/६/२०२३**

**आकुर्डी विठ्ठलमंदीर ते पुण्याकडे प्रस्थान दि.३०/६/२०२३**

**तळवडे वाहतूक विभाग**

| अ.क्र | बंद करणारा मार्ग | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १ | जुना मुंबई पुणे हायवे देहु कमान ते देहुगाव | देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) ते परंडवाल चौक (देहुगाव) हा रोड सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील. | भक्ती-शक्तीचौक ते त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते कॅनबे चौक ते खंडेलवाल चौक देहुगाव असा राहिल. |
| २ | चाकण ते कॅनबे चौक | तळवडे गावठाण चौक ते कॅनबे चौक ते महिंद्रा सर्कल हा रोड सर्व प्रकारच्या जड वाहनांसाठी बंद राहिल. | सदर मार्गावरील वाहने मोशी भारतमाता चौक, नाशिक हायवे मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| ३ | तळेगाव चाकण रोड देहुफाटा ते देहुगाव | तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारची जड वाहतुक बंद राहिल. | एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी राहिल. |
| ४ | देहुकमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक | देहुकमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहिल. | |
| ५ | खंडेलवाल चौक ते देहु कमान मुख्य ते परंडवाल चौक | खंडेलवाल चौक ते देहु कमान (मुख्य) ते परंडवाल चौक जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहिल | |

तरी वरील प्रमाणे तळवडे वाहतूक विभाग हद्दीत वाहतुकीत बदल दि.२६/०६/२०२४ रोजी १२.०० वा ते दि.२९/०६/२०२४ रोजी २१.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन**) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

## देहुरोड वाहतूक विभाग

१. जुना मुंबई पुणे हायवे रोडवरील सेंट्रल चौक देहुरोड ते भक्ती शक्ती मार्गे पुणे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** - वरील मार्गावरील सर्व प्रकारची वाहने सेंट्रल चौक- मामुर्डी – किवळे - भुमकर चौक- डांगे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील

तरी देहुरोड वाहतूक विभागांर्तगत वरील प्रमाणे वाहतुकीत बदल दि.२८/०६/२०२४ रोजी ००.०१ वा ते २९/०६/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन**) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

**निगडी वाहतूक विभाग**

| अ.क्र | बंद करणारा मार्ग | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १ | जुना मुंबई पुणे हायवे भक्ती शक्ती चौक ते | भक्ती शक्ती चौक येथुन पुणे कडे येणारी वाहतुक | काचघर चौककडुन बिजलीनगर चौक मार्गे डांगे चौकातुन पुणेकडे इतरत्र जातील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुणे कडे जाणारा मार्ग | जुन्या मुंबई पुणे रोडने जाण्यास मनाई. | |
| २ | खंडोबा माळ चौक ते टिळक चौक | खंडोबा माळ चौक | खंडोबामाळ चौक येथुन वाहतुक टिळक चौकाकडे न जावु देता ती थरमॅक्स चौक मार्गे किंवा चिंचवड मार्गे वळविणे. |
| ३ | तळवडे ते त्रिवेणीनगर चौक | त्रिवेणीनगर चौक | त्रिवेणीनगर चौक येथे रुपीनगरकडुन येणारी वाहतुक भक्ती शक्ती चौकाकडे येवु न देता ती चिकन चौक मार्गे चाकणकडे वळवतील. |
| ४ | दुर्गामाता चौक ते टिळक चौक | दुर्गामाता चौक | दुर्गामाताचौक चौकाकडे भोसरी कडुन येणारी वाहतुक टिळक चौकाकडे येवु न देता तळवडे रोडने चाकण मार्गाने मुंबईकडे वळविणे. |
| ५ | काचघर चौक ते भक्ती शक्ती | काचघर चौक | काचघर चौक येथील वाहतुक सावली हॉटेल कडे व भक्ती शक्ती चौकाकडे येवु न देता ती भेळ चौका मार्गे वळतील. |
| ६ | लोकमान्य हॉस्पीटल ते टिळक चौक | लोकमान्य हॉस्पीटल | लोकमान्य हॉस्पीटल कडुन येणारी वाहतुक टिळक चौकाकडे येवु न देता ती म्हाळसाकांत चौक मार्गाने खंडोबामाळ चौकाकडे वळवतील. |
| ७ | म्हाळसाकांत चौक ते खंडोबामाळ | म्हाळसाकांत चौक | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यांनतर म्हाळसाकांत चौकाकडुन येणारी वाहतुक आकुर्डी गावठाण खंडोबामाळ चौकाकडे येवु न देता ती टिळक चौक मार्गाने वळवतील. |
| ८ | दिप ज्योती अपार्टमेंट ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | म्हाळसाकांत चौक | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर दिपज्योती अपाटमेंट आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणाक डे येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| ९ | विवेकनगर भाजी मंडई ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | विवेकनगर भाजी मंडई | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर विवेकनगर भाजी मंडई आकुर्डी कडून येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणाकडे येवु ने देता ती शिवम डेअरीला लागुन असलेल्या रोडने डावीकडे वळवुन म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| १० | हनुमान मंदीर ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | हनुमान मंदीर | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर हनुमान मंदिर आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणी येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| ११ | सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट ते विठ्ठलमंदीर आकुर्डी | सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणा येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| १२ | काळभोर नगर ते भक्ती शक्ती चौक सर्व्हिस रोड बंद | काळभोर नगर | काळभोर नगर पासुन भक्तीशक्ती चौकाकडे जाणारी वाहने ग्रेड सेपरेटर मधुन वळविणे. |
| १३ | बिजलीनगर ते भक्ती | बिजलीनगर | बिजलीनगर चौकाकडुन भक्तीशक्ती चौकाकडे |

| | | | |
|---|---|---|---|
| | शक्ती चौक | | वाहतुक न सोडता ती रावेत मार्गे मुंबईकडे पाठविणे. |
| १४ | थरमॅक्स चौक खंडोबामाळ चौक | थरमॅक्स चौक खंडोबामाळ चौक | थरमॅक्स चौकाकडुन येणारी वाहतुक गरवारे कपंनी व खडीमशीन पासुन परशुमराम चौकाकडे वळविणे. |
| १५ | अप्पुघर चौक ते भक्ती शक्ती चौक | अप्पुघर चौक ते भक्ती शक्ती चौक | अप्पुघर चौकाकडुन भक्ती शक्तीकडे वाहतुक बिग इंडीया भेळ चौकातुन इच्छित स्थळी जाईल. |

तरी वरील प्रमाणे निगडी वाहतूक विभाग हद्दीत वाहतुकीत बदल दि.२८/०६/२०२४ रोजी ००.०१ वा ते दि.३०/६/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन**) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

## चिंचवड वाहतूक विभाग

| अ.क्र | बंद करणारा मार्ग | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १ | बिजलीनगर ते भक्तीशक्ती चौक | बिजलीनगर | सदरची वाहने ही बिजलीनगर चौक येथुन डावीकडे वळुन डी.वाय पाटील कॉलेज समोरील मार्गाने रावेत मार्गे मुंबईकडे अथवा डांगे चौक थेरगावकडे जातील. |
| २ | दळवीनगर ते खंडोबामाळ चौक व दळवीनगर ते चिंचवड स्टेशन कडे जाणारा रोड | दळवीनगर | सदरची वाहने ही बिजलीनगर चौक मार्गाने इच्छितस्थळी जातील. |
| ३ | चिंचवड गाव व चाफेकर उड्डानपुल ते महावीर चौक | रिव्हर व्हयु चौक व चाफेकर चौक | सदरची वाहने ही चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेतमार्गे इच्छितस्थळी जातील तसेच भोसरीकडे जाणारी वाहने हि बिजलीनगर चौक, संभाजी चौक, भेळ चौक काचघर चौक भक्ती शक्ती चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. |
| ४ | चिंचवडेनगर टी जंक्शन ते महावीर चौक | टी जंक्शन | सदरची वाहने ही चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेत मार्गे इच्छितस्थळी जातील. तसेच भोसरीकडे जाणारी वाहने हि बिजलीनगर चौक, संभाजी चौक, भेळ चौक काचघर चौक भक्ती शक्ती चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. |
| ५ | लोकमान्य हॉस्पी. ते महावीर चौक | लोकमान्य हॉस्पी. | सदरची वाहतूक लोकमान्य हॉस्पी. चौकातुन दळवीनगर मार्गे जातील. |
| ६ | एस.के.एसफ चौक ते खंडोबा माळ चौक | एस.के.एफ चौक | बिजलीनगर चौक मार्गोने इच्छित स्थळी जातील. |
| ७ | महावीर चौक चिंचवड येथून पालखी पास होत असताना महाविर चौकाकडे येणारी वाहतुक पुर्णतः बंद करण्यात येत आहे. | | |
| ८ | श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक चिंचवड येथून पालखी पास होत असताना शिवाजी चौकाकडे येणारी वाहतुक पुर्णतः बंद करण्यात येत आहे. | | |

तरी वरील प्रमाणे चिंचवड वाहतूक विभाग हद्दीत वाहतुकीत बदल दि.२९/०६/२०२४ रोजी १६.०० वा ते दि.३०/६/२०२४ रोजी १२.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने**

**वगळुन**) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

## पिंपरी वाहतूक विभाग

| अ.क्र | बंद करणारा मार्ग | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १ | महावीर चौक ते डी मार्ट सर्व्हिस रोड बंद | महावीर चौक | डी मार्ट समोरील ग्रेड सेपरेटर मधुन वाहतुक वळविण्यात येईल |
| २ | ॲटो क्लस्टर ते हनुमान मंदीर चौक | ॲटो क्लस्टर | मदर तेरेसा पुला वरुन काळेवाडी मार्गे वळविण्यात येणार आहे. |
| ३ | पिंपरी पुल ते सम्राट चौक | अहिल्यादेवी होळकर चौक बंद | महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील |
| ४ | पिंपरी चौक ते गांधीनगर | आंबेडकर चौक | रॅाक्सी हॅाटेल व गोकुळ हॅाटेलमार्गे इच्छित स्थळी जातील |
| ५ | गांधीनगर ते आंबेडकर चौक | गांधीनगर | नेहरुनगर मार्गे इच्छितस्थळी जातील |
| ६ | वल्लभनगर ते पुणे सर्व्हिस रोड बंद | वल्लभनगर | ग्रेडसेपरेटर मार्गे पुणे बाजुकडे जातील |
| ७ | वल्लभनगर आऊटलेट बंद | सदर मार्गावरुन वाहने सर्विसरोडने न येता ग्रेडसेप्रेटर मधुन पुण्याकडे जातील | |
| ८ | केएसबी चौक ते शिवाजी चौक तसेच ॲटो क्लटार | केएसबी चौक | सदर मार्गावरील वाहने केएसबी चौकाकडुन भोसरी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| ९ | सम्राट चौक ते मोरवाडी चौक | सम्राट चौक | सदर मार्गावरील वाहने रसरंग चौक, मदर टेरेसा ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील. |

तरी वरील प्रमाणे पिंपरी वाहतूक विभाग हद्दीत वाहतुकीत बदल दि.३०/०६/२०२४ रोजी ००.०० वा ते २१.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (**अत्यावश्यक सेवेतील वाहने व दिडींतील वाहने वगळुन**) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

## भोसरी वाहतूक विभाग

दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पहाटे ०४.०० वा ते २२.०० वा.पर्यत पुणे नाशिक महामार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना भारतमाता चौक, मोशीगांव चौक पांजरपोळ चौक भोसरी -आळंदी रोड, भोसरी-दिघी रोड, तसेच नाशिकफाटा जुना पुणे-मुंबई रोड, याठिकाणा वरुन आळंदी, दिघी तसेच पुणे शहारात जाण्यास प्रवेश बंदी असेल.

**पर्यायी मार्ग:-**

१. मोशीवरुन शिवाजीनगर कडे जाणा-या वाहन चालकांनी पांजरपोळ चौक उजवीकडे वळुन स्पाईनरोड टेल्को कंपनी पाठीमागील बाजुने केएसबी चौक उजवीकडे वळुन सरळ थॅरमॅक्स चौक डावीकउे वळुन खंडोबामाळ मार्गे चिंचवडगांव उजवी कडे वळुन डांगेचौक डावीकउे वळुन औंध मार्गे शिवाजीनगर व इच्छित स्थळी जाता येईल. (हलकी वाहने)

२. भोसरी वरुन शिवाजीनगर जाणा-या वाहन चालकांनी बाबर पेट्राल पंप उजवी कडे वळुन टेंल्कोरोड ने केएसबी चौक मार्गे वरील प्रमाणे जातील. तसेच नाशिकफाटा ओव्हर ब्रिज वरुन सरळ कोकणेचौक वरुन जगताप डेअरी चौक कडुन इच्छित स्थळी जातील.

तरी वरील प्रमाणे भोसरी वाहतूक विभाग हद्दीत वाहतुकीत बदल दि.३०/०६/२०२४ रोजी पहाटे ०४.०० वाजे पासुन २२.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) सर्व प्रकारचे वाहनांसाठी लागु राहिल.

## आषाढी वारी यात्रा २०२४  पार्किंगची ठिकाणे

| अक्र | आळंदी | तळवडे (देहूगाव) |
|---|---|---|
| १. | आळंदी- देहु रोड - तळेकर पाटील चौक(दक्षिणेस) -३ एकर | देहुगाव येथील गायरान मैदान |
| २. | आळंदी- देहु रोड - तळेकर पाटील चौक( उत्तरेस) -१ एकर | सीओडी मैदान(राधा कृष्ण मंगलकार्यालयाजवळील) |
| ३. | ज्ञानविलास कॉलेज डुडुळगाव जकातनाका जवळ -१० गुंठे | |
| ४. | बोपदेव चौक -४.५ एकर | खंडेलवाल चौक येथील माऊली वजन काट्याशेजारील मैदान |
| ५. | इंद्रायणी हॉस्पीटल समोर (चाकण रोड)९ एकर | |
| ६. | विश्रांतवड वडगाव रोड २५ एकर | |
| ७. | मुक्ताई मंगल कार्यालया समोर १ एकर | |

वरील वाहतुक बदल हा अत्यावश्यक सेवेतील वाहने व दिंडीतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून सर्व वाहनांकरीता लागू करण्यात येत असून अधिसुचना (नोटीफिकेशन)काढण्याल येत आहे तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

**टिप - वरील प्रमाणे वाहतूक वळविण्यात आली आहे. परंतु आवश्यकतेनुसार टप्याटप्याने वाहतूक चालु/बंद करण्यात येईल.**

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाख पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, दिघी आळंदी,भोसरी,तळवडे,देहुरोड,निगडी,चिंचवड,पिंपरी वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.